# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
## दिनांक १४.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १२,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदरा खाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दिनांक १२/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन बासंबा येथे ०२ तसेच वसमत शहर येथे ०१ अशा एकुण ०३ ठिकणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ३६.१२ लिटर दारू असा एकुण ४,६००/—रू कि.ची अवैध दारूचासाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.